CMYK

सुविचार
सौम्य शब्दांनी कठोर हृदयं देखील जिंकता येतात.

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ दैनिक ■ धाराशिव
■ अंक 107 ■ वर्ष 2 रे
■ मंगळवार दि.27 मे 20
■ RNI NO -2023/90078
■ पाने 04 ■ किंमत रू 5



# परतीसारखा तुफान पाऊस, नद्यांना खळखळाट, रान,शिवारात पाणीच पाणी

## उमरग्यात वस्त्यांमध्ये घुसले पाणी,धाराशिव जलमय

आरंभ मराठी | धाराशिव

उन्हाळ्याचे काही दिवस शिल्लक असतानाच मे महिन्यांतच अचानकपणे सुरू झालेल्य अवकाळी पावसाने अक्षरश: कहर केला आहे. जिल्ह्यात सर्वदूर पाऊस कोसळत असून, आठ दिवसांपासून सुरू असलेल्या या पावसाने आता नद्या-नाल्यांना खळखळाट सुरू झाला आहे. सोमवारी झालेल्या मुसळधार पावसाने धाराशिव शहर जलमय झाले.विविध भागात नाल्या तुंबल्याने रस्त्यांवर पाणीच पाणी साचले होते. उमरगा शहरात पावसाच्या पाण्याने वस्तीमध्ये पाणी शिरले. शेत शिवारांमध्ये सर्वत्र पाणी झाले असून, इतिहासात प्रथमच महिन्यात इतक्या मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याचे सांगण्यात येत आहे.

### २४ तासांत अतिवृष्टीचा इशारा

धाराशिव जिल्ह्यात येत्या २४ तासांत मुसळधार पावसाचा इशारा दिला असून, त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. यासंदर्भात जिल्हा प्रशासनाच्या वतीने नागरिकांना मोबाईलवरून सावधानता बाळगा, असे संदेश पाठवण्यात आले. सोमवारी दिवसभर मुसळधार पाऊस झाल्यानंतर येत्या २४ तासांत यलो अलर्ट देण्यात आला असून, काही भागात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे.

### आपत्ती व्यवस्थापन सज्ज

जिल्ह्यात गेल्या चोवीस तासांत जोरदार पावसाने शेतीचे नुकसान झाले आहे. येत्या चोवीस तासांत मोठ्या पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी. जिल्ह्यातील साडेचार लाख नागरिकांना संदेश पाठविण्यात आले आहेत. संकटाच्या वेळी कोणतीही अडचण निर्माण झाल्यास आपत्ती व्यवस्थापनाची टीम सज्ज आहे.

-किर्ती किरण पुजार, जिल्हाधिकारी,

### काळजी घ्या, अडचणीत असाल तर फोन करा आमदार कैलास पाटील यांचे आवाहन

हवामान खात्याच्या अंदाजानुसार धाराशिव जिल्ह्यात २४ तासांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून, नागरिकांनी काळजी घ्यावी,कोणतीही अडचण आल्यास मला किंवा स्थानिक शिवसैनिकांना फोन करावा, असे आवाहन शिवसेनेचे (उबाठा गट) जिल्हाप्रमुख तथा आमदार कैलास पाटील यांनी केले आहे.

महाराष्ट्रात गेल्या १५ दिवसांपासून सर्वदूर जोरदार पाऊस सुरू आहे. धाराशिव जिल्ह्यातही दररोज पावसाची हजेरी आहे.त्यामुळे वातावरणात बदल झाला असून, उन्हाळ्यात पावसाळ्यासारखे चित्र निर्माण झाले आहे. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार पावसाचा जोर वाढत आहे. वाढलेल्या पावसाने जमिनीची धूप कमी झाली असून, वातावरणात गारठा निर्माण झाला आहे. सोमवारी दुपारपासून जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात मेघगर्जनेसह जोरदार पावसाला सुरूवात झाली. उमरगा शहरासह तालुक्यात झालेल्या पावसाने नद्यांना पाणी आले होते. शहरातील अनेक भागात वस्त्यांमध्ये पाणी शिरले. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. तुळजापूरमध्येही जोरदार पाऊस झाला. भूम परिसरात झालेल्या जोरदार पावसाने शेतात पाणीच पाणी झाले होते. या पावसाने मे महिन्यातील अवकाळी पावसाचे रेकॉर्ड मोडले आहे. नद्यांना खळखळाट सुरू असून, अनेक तलावांमध्ये पाणी पातळी वाढू लागली आहे.

# ८ कोटी रुपये खर्च,बस स्थानकाला पहिल्याच पावसात लागली गळती

## निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी,लोकप्रतिनिधी -प्रशासन दखल घेणार का ?

सुरज बागल | आरंभ मराठी

तुळजापूर - आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांच्या सोयीसाठी बांधण्यात आलेल्या तुळजापूर येथील जुन्या बस स्थानकाला पहिल्याच पावसात गळती लागली असून अक्षरशः प्रवाशांना उभा राहण्याची जागा नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या निकृष्ट दर्जाच्या झालेल्या कामावर आता कारवाई होणार का तसेच लोकप्रतिनिधी व प्रशासनाची दखल घेणार का ? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.तुळजापुरला दररोज हजारोंच्या संख्येने भाविक येतात मंगळवार, शुक्रवार, रविवार तसेच सलग सुट्ट्यांच्या दिवसात ही गर्दी लाखांच्या घरात असते. वर्षातून दोनदा म्हणजे शारदीय नवरात्र महोत्सव चैत्र पौर्णिमेला तर मोठ्या संख्येने भाविक येत असतात. काही वर्षांपूर्वी शहरातील येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता लातूर रोड येथे नवीन बस स्थानक उभारण्यात आले. त्यानंतर जुने बस स्थानक पाडून त्या ठिकाणी नवीन बस स्थानक बांधण्याचे बांधकाम सुरू झाले. बांधकामाच्या सुरुवातीपासूनच हे वादग्रस्त राहिले आहे. निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचे सांगत अनेकांनी याबाबत आंदोलन, निवेदन तसेच उपोषण देखील केले होते. मात्र त्याची म्हणावी तेवढी दखल घेतली गेली नाही. हे बस स्थानक बांधून तयार झाल्यानंतर याच्या उद्घाटनाची तारीख ३० एप्रिल ठरवली गेली. उद्घाटन चार दिवसावर आल्यानंतर घाईगडबडीत संरक्षण भिंतीचे काम आटोपण्यात आले. यामध्ये जुन्या संरक्षण भिंतीवरच विटा ठेवून हे बांधकाम करण्यात आले. त्यामुळे याच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उद्घाटन झाल्यानंतरही या स्थानकात काही सुविधा अपुऱ्या असल्याने याचे उद्घाटन झाल्यानंतर ही काही दिवस बस स्थानक बंद होते. त्यानंतर हे बस स्थानक सुरू करण्यात आले. दरम्यान मे महिन्यात अवकाळी पाऊस आला आणि या बस स्थानकाचे पितळ उघडे पडले. बस स्थानकात सर्वच बाजूने पाणी येत असल्याने प्रवाशांना उभा राहण्यासाठी देखील जागा नसल्याचे दिसून आले. त्यामुळे बस स्थानकाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून




### अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करावा

या बस स्थानकाचे बांधकाम सुरू झाल्यानंतरच याबद्दल मी जिल्हाधिकारी तसेच एसटी खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली होती. मात्र याबाबत कोणती दखल घेतली गेली नाही. उलट माझ्यावरच गुन्हा दाखल करण्याची तयारी करण्यात आली होती. बस स्थानकाचा बांधकाम परवाना देखील घेतला नव्हता मी तक्रार केल्यावर तो घेण्यात आला. या निकृष्ट दर्जाच्या कामात जबाबदार असणारे अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा.

-श्रीकृष्ण सूर्यवंशी
तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट

### संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत

यासंदर्भातएसटीमहामंडळाचेअधिकारीतसेचसार्वजनिकबांधकामविभागाच्या अधिकाऱ्यांनी बस स्थानकाची पाहणी केली आहे. बस स्थानकात ज्या समस्या आहेत त्या दूर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच उर्वरित कामे देखील लवकर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. प्रवाशांना बस स्थानकात काही त्रास होणार नाही याची काळजी घेण्यासाठी प्रयत्न केले जातील.

-राणाजगजितसिंह पाटील
आमदार, तुळजापूर.

काही प्रवाशांनी प्रतिक्रिया देताना जनावरांचा गोठा देखील यापेक्षा चांगला असतो अशी संतप्त प्रतिक्रिया दिली. याबाबत प्रशासन तसेच लोकप्रतिनिधी दखल घेणार का व या निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करणार का याकडे आता प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

## तुळजापूर शहरातील फुटपाथचा ई-लिलाव रद्द करण्याची जनहित संघटनेची मागणी



आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरातीलहोणारा फुटपाथचा ई-लिलाव रद्द करावा अशी मागणी जनहित संघटनेच्या वतीने नगर परिषदेकडे करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फुटपाथ हा गोरगरिबांच्या रोजी रोटीचे माध्यम असून अनेक गोरगरीब शेतकरी, चर्मकार, तसेच इतर छोटे मोठे व्यावसायिक येथे व्यवसाय करून आपले पोट भरत असतात.२०१७ साली देखील असा प्रयत्न झाला होता. मात्र जनहित संघटनेच्या आंदोलनाच्या इशाऱ्या नंतर तुळजापूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष यांनी हा ठराव रद्द केला होता. त्यामुळे फुटपाथ कर वसुलीचा ठराव रद्द करावा अशी मागणी जनहित संघटनेने निवेदनाद्वारे मुख्याधिकारी नगरपरिषद तुळजापूर यांच्याकडे केली आहे. तसेच हा ठराव रद्द न केल्यास नगर परिषदेच्या नावाने बोंबमारो आंदोलन करण्याचा इशारा देखील यावेळी देण्यात आला आहे. यावेळी त्यांनी संघटनेचे अध्यक्ष अजय साळुंखे, प्रशांत कदम, युवराज साठे, विशाल साळुंखे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

CMYK

# पालकांच्या अपेक्षेचं ओझं पाल्यासाठी जीवघेणं
# खोटी प्रतिष्ठा आणि पाल्याचा विस्कटलेला जीवघेणा प्रवास

आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनाचे माध्यम राहिले नसून ते यश, प्रतिष्ठा आणि सामाजिक स्थानाचे मोजमाप ठरले आहे. विशेषतः भारतात, शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान नव्हे, तर ते एक मार्ग आहे डॉक्टर, इंजिनिअर, आयएएस, किंवा परदेशात स्थायिक होण्याचा. या सगळ्या प्रक्रियेत एक महत्त्वाचा घटक दुर्लक्षित होतो तो म्हणजे 'विद्यार्थी' स्वतः. आजच्या काळात पालकांची अपार अपेक्षा, समाजाच्या नजरा आणि अनावश्यक प्रतिष्ठेच्या हव्यासातून विद्यार्थ्यांवर टाकले जाणारे ओझे अक्षरशः जीवघेणं ठरत आहेप्रत्येक पालक आपल्या मुलाचं भलं चिंततो, हे निर्विवाद. परंतु भल्यासाठीच योग्य मार्ग निवडला जातोय का? अनेक वेळा पालक आपली अपूर्ण स्वप्ने, समाजातील स्पर्धेची भीती, किंवा 'माझं मूल इतरांपेक्षा सरस असावं' ही भावना मुलांवर लादतात. यामध्ये त्या विद्यार्थ्याची स्वाभाविक रुची, क्षमता, किंवा स्वप्न याचा विचारच केला जात नाही.दहावी–बारावी नंतर 'सायन्स घे, डॉक्टर हो', 'इंजिनिअरिंग कर म्हणजे भविष्य उज्वल', 'सरकारी नोकरीसाठी तयारी कर' हे वाक्य आजच्या तरुणांना काही नवीन नाहीत. अनेकदा मुलं काही न सांगताच आई–वडिलांच्या अपेक्षांचं ओझं उचलतात आणि हळूहळू त्यांच्या स्वतःच्या इच्छांचं गळू लागतो. या दबावामुळे नैराश्य, चिंता, आणि आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे अलीकडच्या काळात अनेक किशोरवयीन विद्यार्थी परीक्षेच्या ताणामुळे आत्महत्या करताना दिसले आहेत. काही विद्यार्थी फक्त 'अपेक्षा पूर्ण न होण्याच्या भीतीने' आत्महत्या करतात, हे किती भयावह आहे! विद्यार्थ्यांची ही स्थिती म्हणजे समाजाच्या, पालकांच्या आणि शिक्षणपद्धतीच्या अपयशाचे जिवंत उदाहरण आहे. समस्या गंभीर असली, तरी मार्ग आहेत. पालकांनी आपल्या मुलाशी संवाद साधायला हवा, केवळ ''काय मार्क मिळवलेस?'' एवढंच विचारायचं नसून ''काय आवडतं?'', ''काय करायला आवडेल?'', ''कशात आनंद वाटतो?'' यासारखे प्रश्न विचारून मुलांशी मैत्री करायला हवी. त्यांच्या भावनांना, स्वप्नांना मान्यता दिली गेली पाहिजे. समाजानेदेखील यशाची व्याख्या बदलायला हवी. प्रत्येक व्यक्ती डॉक्टर, इंजिनिअर, किंवा सरकारी अधिकारी होईलच असं नाही. कुणाला चित्रकला आवडते, कुणाला संगीत, कुणी उद्योजक बनू इच्छितो हे सगळं समाजाने आणि पालकांनी स्वीकारायला हवं. शाळा आणि कॉलेजांनीदेखील यशाच्या मोजपट्ट्या केवळ गुणांपुरत्या न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर द्यायला हवा. मानसिक आरोग्यावर लक्ष द्यावं लागेल, काउंसिलिंग केंद्रांची सोय करावी लागेल आणि एक समंजस शैक्षणिक वातावरण निर्माण करावं लागेल.



प्रमोद राऊत,
धाराशिव
मो.९३७३४३८३५२

## खोटी प्रतिष्ठा समाजात दाखवायचं काय?

समाजाची मानसिकता अजूनही 'माझं मूल काय करतो?' यावरून पालकांचं स्थान ठरवते. समाजाकडून मिळणारी 'वा, तुमचा मुलगा डॉक्टर झालाय का?' किंवा 'तिचं इंजिनिअरिंग चालू आहे, फार छान!' ही वाहवा पालकांना हवी असते, पण त्यासाठी त्यांचा मुलगा किंवा मुलगी कोणत्या मानसिक अवस्थेतून जात आहे, याचा विचार होत नाही. सोशल मीडियावर दाखवले जाणारे फोटो, रिझल्टचे स्क्रीनशॉट्स, परदेशात गेलेल्या मुलांचे व्हिडीओ हे सगळं खोट्या प्रतिष्ठेचा भाग झालं आहे.शिक्षणसंस्थांमध्ये होणारी अट्टाहासाने रँक, टॉपर्स, आणि परफॉर्मन्सची स्पर्धा विद्यार्थी वर्गाला एका मानसिक खेळात अडकवते. पालक ज्या प्रकारे आपल्या मुलावर शिकवण्या, क्लासेस, आणि चाचण्यांचा मारा करतात, त्यात मुलांचे लहानसहान स्वप्न, कला, खेळ, मैत्री सगळं हरवत जातं. मानसिक आरोग्याची घसरण, आत्मविश्वासाचा अभाव, सततची तुलना हेच शालेय जीवनाचे 'नॉर्मल' बनलं आहे.

## शहरी भागातील पालकांचा दृष्टिकोनः स्पर्धा आणि प्रतिष्ठा


शहरी भागात शिक्षण म्हणजे करिअरचा शॉर्टकट. डॉक्टर, इंजिनिअर, सीए, आयटी प्रोफेशनल अशा 'टॉप' पदांवर पोहोचणं ही पालकांची स्वप्नं असतात. सोशल मीडियावर इतर मुलांची यशोगाथा पाहून आपल्याही मुलाला तशीच प्रतिष्ठा मिळवून द्यायची हाव वाढते. पालक अनावश्यक कोचिंग क्लासेस, एक्स्ट्रा प्रेशर आणि १२–१४ तास अभ्यासाची अपेक्षा करतात. या जीवघेण्या स्पर्धेत विद्यार्थ्यांचं मानसिक आरोग्य ढासळतं.

## ग्रामीण भागातील चित्रः गरिबी, आशा आणि अपूर्ण स्वप्नं

ग्रामीण भागात परिस्थिती वेगळी असली तरी अपेक्षा अधिक भावनिक आणि प्रखर असतात. 'आपलं मूल शिकून मोठं अधिकारी होईल' ही आशा अनेकदा त्या मुलाच्या पेलण्याच्या ताकदीपलीकडची असते. संसाधनं कमी, मार्गदर्शनाचा अभाव, आणि सामाजिक दबाव यामुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळत नाही. तरीही पालकांना वाटतं, ''मुलगा शिकून गावाचं नाव मोठं करेल.'' ही अपेक्षा अनभिज्ञपणे मानसिक ओझं वाढवते.

## मानसिक आरोग्याचा गंभीर प्रश्न

विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, चिंता विकार (anxiet), आणि आत्ममूल्य कमी होणे ( low self-esteem-) हे सामान्य झाले आहे. 'जर मार्क कमी मिळाले, तर आई–वडील नाराज होतील', 'सगळे मला अपयशी समजतील', 'माझं आयुष्यच संपलं' हे विचार सतत मनात घोळतात. कुठेही भावनिक आधार न मिळाल्यास अनेक मुलं आत्महत्येपर्यंत जातात. विशेषतः किशोरवयात जेव्हा व्यक्तिमत्व घडतं, स्वप्न आकार घेतात त्याच वेळी जर मूल अपेक्षांच्या दडपणाखाली येत असेल, तर त्याचे दीर्घकालीन परिणाम फार गंभीर ठरतात. आजही अनेक पालक ''आमच्या काळात इतका अभ्यास करावा लागत नव्हता, आता एवढं सगळं मिळतंय, मग ताण कसला?'' असं म्हणत विद्यार्थ्यांचे भावनिक प्रश्न दुर्लक्षित करतात.



## पालकांनी बदललेली मानसिकता स्वीकारणे आवश्यक आहे

आजचंशिक्षणआणिकरिअरजगफारगतिमानआहे.मुलांचेकल,आवड,आणि क्षमता जाणून घेऊन त्यानुसार मार्गदर्शन केल्यास त्यांचं यश अधिक स्थायी ठरू शकतं. सर्वांनी डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हावं ही कल्पनाच चुकीची आहे.

## संवाद कुटुंबातील सर्वात मोठं साधन

प्रत्येक दिवसाच्या शेवटी पाल्याशी संवाद साधा ''काय शिकलास?'', ''काय आवडलं?'', ''कशामुळे ताण वाटतो?'' हे प्रश्न तुमच्या आणि त्यांच्या नात्यात विश्वास निर्माण करतील. संवादातूनच ताण ओळखता येतो आणि तो हलका करता येतो. शिक्षणसंस्थांनी केवळ गुणांवर भर न देता विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासावर लक्ष केंद्रित करायला हवं. दर शाळेत मानसिक आरोग्य सल्लागार (counselor) नेमणं आज काळाची गरज आहे. विद्यार्थी केवळ परीक्षेतील यशाने नव्हे, तर स्वत्व जपल्याने घडतो.

## समाजाने यशाची व्याख्या बदलली पाहिजे

मुलगा परदेशी गेला, म्हणजे यशस्वी ही जुनी व्याख्या आहे. समाजाने कलात्मक, क्रीडाविषयक, उद्योजकता क्षेत्रातील यशालाही तेवढीच मान्यता द्यायला हवी. ''माझं मूल आनंदी आहे, स्वतःचा मार्ग शोधत आहे'' हेच पालकत्वाचं खरे यश आहे. पालकांची प्रतिष्ठा ही त्यांच्या मुलांच्या यशावर आधारित असू नये, तर त्यांच्या समजूतदार पालकत्त्वावर असावी. प्रत्येक मुलाची क्षमता वेगळी असते, त्याला आपलं स्थान शोधण्यासाठी थोडी मोकळीक, थोडा आधार आणि भरपूर विश्वास हवा असतो. आपण समाज म्हणून जर हे समजून घेतलं, तर पालकांची 'प्रतिष्ठा' आणि पाल्याचा 'प्रवास' दोन्ही खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतील. अन्यथा अपेक्षांचं ओझं हे विद्यार्थ्यांसाठी केवळ एक 'जीवघेणं' वास्तव बनून राहील. शहरी आणि ग्रामीण, दोन्ही पार्श्वभूमीत पालकांची 'भविष्य घडवण्याची' भावना योग्य असली, तरी तिचं अंध अनुकरण, प्रतिष्ठेचा हव्यास आणि समाजाच्या नजरेची भीती मुलांच्या जीवनावर फार मोठा परिणाम करते. मुलं फुलांसारखी असतात त्यांच्या रंगांची, वाऱ्याशी खेळण्याची, स्वतःचं अस्तित्व निर्माण करण्याची संधी त्यांना द्या.'अपेक्षा ठेवा, पण विश्वास द्या. मार्ग दाखवा, पण मोकळीक ठेवा. तुलना न करता स्वीकार करा.' या विचारानेच आपण खऱ्या अर्थाने शिक्षित, संवेदनशील पालक आणि समाज बनू शकतो.

## वार नियतिचे

कसा प्राणाला मुकला
तुकडा काळजाचा
प्रेमा खातीर तिने
अंत केला जीवनाचा..

साधन संपत्तीसाठी
गेला तिचा हुंडाबळी
पोटच्या लेकराची
कशी खुलेल आता कळी...

खऱ्या प्रेमातल्या
आणा भाका पडल्या फिक्या
पुन्हा एकदा प्रेयसीच्या
भावना झाल्या मुक्या....

माय बापाच्या काळजावर
झाले नियतीचे वार
मुलींनो नका करू असे
प्रेमविवाह सांगतात वारंवार...

अस्तित्व जपूनच
टाकावे पुढचे पाऊल
तरच जीवनात तुमच्या
लागेल सुखाची चाहूल...

आयुष्य बदलवणारा
नका निर्णय घेऊ
फास देणारा साज
उगीच अंगावर नका चढवू...

जीवन आहे अनमोल
जगा त्यांच्यासाठी
जे अखंड धडपडतात
तुमच्याच सुखासाठी....

सारिका देशमुख
धाराशिव

## लाडकी लेक

ती लाडकी लेक तिच्या बाबांची
ती काळजाचा तुकडा आईची
ती लाडकी नात तिच्या आजोबांची
ती गोंडस नात तिच्या आजीची
ती लाडकी बहिण तिच्या भावाची
ती जीव की प्राण तिच्या बहिणीची
तळहातावरच्या फोडाप्रमाणे तिला
नातेवाईकांनी जीवापाड जपलेली
मामा मामी तिला जीव लावतात
सुनबाई म्हणून तिला संबोधतात
सणावाराला आत्या घरी येते
भावाच्या लेकीला सूनबाई म्हणते
पण संशयाची पाल चुकचुकते
कुठे व्यवहाराची माशी शिंकते
परकी उपवर मुले पहायला येतात
पसंत असल्याचा होकार देतात
त्यापैकी एक स्थळ पसंत येते
सोयरीकीची लगेच बैठक होते
हुंडाबिंडा मानपानाची बोली लागते
सर्वात शेवटी सुपारी फुटते
थाटामाटात लग्न पार पडते
लाडकी लेक नांदायला जाते
नव्याचे नऊ दिवस संपतात
सासरचे लोक तिला छळतात
अतिलोभाचा कळस गाठतात
हुंडाबळी करून पसार होतात
लाडक्या लेकीचा जीव जातो
बाप दुःख आवेगाने हंबरडा फोडतो
अतिदूरच्याला मुलगी देऊ नका
कोणाच्याही पदरात टाकू नका
माणसं ओळखा संस्कार शोधा
हृदयाचे हृदयाशी नाते जोडा

– बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर
.मो. ९५४५४४२६४८.

# पोलिस अधिकाऱ्यांचा महिलांच्या वतीने सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिवच्या नूतन पोलीस अधीक्षक रितु खोकर यांचा महिलांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी, विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी भाजपा महिला जिल्हाध्यक्ष नंदाताई पुनगडे,प्रदेश कार्यकारणी सदस्य मिनाताई सोमाजी,माजी जि प सदस्य अंजलीताई बेताळे, अनिताताई तोडकर, आशाताई लांडगे, भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस देवकन्याताई गाडेउपस्थितहोत्या.

# मान्सून कालावधीत प्रत्यक्ष क्षेत्रपातळीवर जाऊन काम करा– पालकमंत्री शंभूराज देसाई

आरंभ मराठी | सातारा

मान्सून कालावधीत जिल्हा प्रशासनाने सतर्क राहून प्रत्यक्ष क्षेत्रपातळीवर जाऊन काम करावे. काम करीत असताना नागरिकांच्या अडचणी दूर कराव्यात. मान्सून कालावधीत अति पावसामुळे कोणत्याही गावाचा संपर्क तुटल्यास संपर्क पुन्हा प्रस्थापित करुन देण्याची खबरदारी घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात मान्सूनपूर्व आढावा बैठक पालकमंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, आमदार महेश शिंदे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोषी, उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता अरुण नाईक, जयंत शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.सातारा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे, असे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, पावसामुळे जिथे शेती पिकांचे, पशुधनाचे नुकसान झाले आहे त्याचे पंचनामे पाऊस उघडताच गतीने सुरु करावे. या पंचनाम्यातून एकही बाधित मदतीपासून वंचित राहू नये. दरड प्रवण गावांचे जीआयएस सर्व्हेक्षण झाले आहे. ज्या गावांचे स्थलांतर करण्याबाबत सांगितले आहे त्या गावांच्या स्थलांतरासाठी शासकीय जमिनीचा शोध घ्यावा.मान्सून कालावधीत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) एक पथक कोयनानगर येथे ठेवावे, असे निर्देश देऊन पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, शेंद्रे ते कागल रस्त्यांचे काम सुरु आहे. या कामाच्या अनुषंगाने सेवा रस्त्यावर ठेवलेली विविध यंत्रे काढून सेवा रस्त्यावरील वाहतूक विना अडथळा होईल याची दक्षता घ्यावी. सध्या पावसामुळे महामार्गावर पाणी येत आहे. यामुळे वाहतुक कोंडी होत आहे. महामार्गालगची गटारे साफ करावीत. वाहतुकीदरम्यान वाहनधारकांना कोणतीही अडचण होणार नाही याची रस्ते विकास महामंडळाने खबरदारी घ्यावी,



असेही निर्देश पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिले.मदत व पुनर्वसन मंत्री श्री. पाटील म्हणाले, जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांमध्ये प्रचंड प्रमाणात पाऊस झाला आहे. या पावसामुळे शेती पिकांचे व पशुधनाचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांना तातडीने मदत मिळण्यासाठी पंचनामे करावेत. ज्या गावांवर डोंगरातील दरडी पडत असतील तर अशा गावांमध्ये डोंगराच्या कडेला बांबू लागवड करावी. बांबू मुळे दरडी पडण्याचे प्रमाण खुप कमी असते. दरड प्रवण गावांचे जीआयएस सर्व्हेक्षण झाले असून आवश्यकतेप्रमाणे पुन्हा या गावांचे सर्व्हेक्षण करावे.दरड प्रवण गावांमधील नागरिकांची राहण्याची सोय करावी. महामार्गावरील तुंबलेली गटारे खुली करावीत. तसेच रस्ते विकास महामंडळाने महामार्गावरील गस्त वाढवावी, अशा सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. भोसले यांनी बैठकीत केल्या.

# कुलकर्णी, वरुडकर, बागल, लोंढे यांचा नरेंद्र पाटील यांच्या हस्ते सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या हस्ते अण्णासाहेब पाटील फाउंडेशनच्या वतीने दत्ताभाऊ कुलकर्णी, ॲड. अमोल वरूडकर तसेच प्रवीण बागल आणि अजिंक्य लोंढे यांचा सत्कार करण्यात आला.भाजपच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा यथोचित सन्मान करण्यात आला तसेच त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच विधीज्ञ मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ॲड.अमोल वरूडकर, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रवीण बागल यांनाही पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. अजिंक्य सतीश लोंढे या विद्यार्थ्याने फ्युचर होम वर्किंग मॉडेल तयार केल्याबद्दल नरेंद्र पाटील यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी अण्णासाहेब पाटील फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष खंडू राऊत यांच्यासह सोलापूर येथील अनंत जाधव, जालना जिल्हाध्यक्ष रामभाऊ कणके, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष राजसिंहा राजेनिंबाळकर, मुकुंद घाडगे, संकेत सूर्यवंशी, गणेश साळुंके, अमर माळी, सतीश लोंढे, महेश राऊत, संदीप पाटील, वैभव कुलकर्णी आदी उपस्थित होते.









# वाहतूक कोंडीने उमरगेकर त्रस्त;कधी मिळणार मोकळा श्वास

## फेरीवाले आणि मोकाट जनावरांचा रस्त्यावरच ठिय्या, रहदारीस अडथळा

शेखर कोटे | आरंभ मराठी

उमरगा–वाहतूक कोंडी ही समस्या दिवसेंदिवस वाढत उग्ररूप धारण करीत आहे. सण समारंभ, मोर्चे, मिरवणूक यात अधिक भर घालतात. शहरात वाहतूक कोंडीमुळे प्रवास करण्यास बराच वेळ जातो. रस्त्यावरील किरकोळ भांडणे वाढतात, वाहनचालकांची चिडचिड वाढते, वाहनांचे इंजन मोठ्या प्रमाणात जळते. ज्यामुळे ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढते. उमरगा शहरातील वाहतूक कोंडी संपायचे नाव घेत नसून, संबंधित विभागाकडून त्याबाबत उपाययोजना केल्या जाताना दिसत नाहीत. परिणामी मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या उमरगा शहराची ओळख आता बेशिस्त वाहतुकीचे शहर असे बनत चालल्याचे चित्र दिसत आहे. उमरगा शहरातील बाजारपेठ शिवाजी महाराज चौक, शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर विस्तारलेली आहे. या महामार्गावर वाहनांची सातत्याने गर्दी असते त्यातच ग्राहकाच्या वाहनांची भर पडत असल्याने कोंडी वाढतच आहे. विशेषता पोलीस स्टेशन, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे चौक, आरोग्य नगर रोड ते बसस्थानक प्रवेशद्वार या भागात कोंडी जास्त प्रमाणात जाणवत आहे. उमरगा शहरातून सोलापूर – हैदराबाद हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ गेला आहे. या महामार्गाला उमरगा शहराबाहेरून बायपास मार्ग काढण्यात आलेला आहे. तरीसुद्धा बहुतांश वाहने बाह्यवळण रस्त्याचा उपयोग न करता शहरातून जातात. त्यामुळे हा रस्ता वाहतुकीने सातत्याने गजबजलेला असतो. या मार्गावर कोणते अतिक्रमण असणे धोकादायक ठरू शकते ही बाब सर्वच यंत्रणांनी म्हणजे राष्ट्रीय महामार्ग विभाग, नगरपरिषद, पोलीस प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींनी ही गांभीर्याने घ्यायला हवी. दुर्दैवाने यातील एकही घटक याबाबत संवेदनशील नसल्याचे दिसते त्यामुळे सततच्या वाहतूक कोंडीने शहरवासीयांची मात्र गैरसोय होताना दिसत आहे.

### रस्त्याच्या कडेला हातगाडे

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या शेजारी बाजारपेठ आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गाशेजारी वाहने पार्किंग करून बाहेरगावचे नागरिक बाजारात खरेदीसाठी जातात. उमरगा शहरात वाहन पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे रस्त्याची एक बाजू पूर्णतः वाहन पार्किंगसाठी रिकामी ठेवणे गरजेचे आहे. हातगाडे वाल्यांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूला स्टॉल लावले आहेत. त्या स्टॉलपुढे वाहने लावू नयेत म्हणून अडथळा निर्माण करतात. याबाबत वाहनधारकांनी जाब विचारल्यास अरेरावी केली जात असल्याचे वाहनधारक सांगत आहेत. रस्त्याच्या कडेला असलेल्या मोकळ्या जागेत हातगाडे तसेच फळांचे कॅरेट ठेवून विक्री केली जात असल्यामुळे सर्वच वाहन चालक आपली वाहने महामार्गावरती थांबवून खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत जातात.

### पादचाऱ्यांना करावी लागते कसरत

रस्त्यावरती वाहने उभी केली जात असल्यामुळे आणि रस्त्याच्या साईडला हात गाडी वाल्यांनी स्टॉल लावल्यामुळे पायी चालत जाणाऱ्या पादचाऱ्यांना खूप कसरत करावी लागत आहे.




### ॲम्बुलन्सलाही मिळत नाही रस्ता

उमरगा शहरात अनेक नावाजलेले हॉस्पिटल असल्याने जवळपास असलेल्या ग्रामीण भागातील अनेक रुग्ण उपचारासाठी शहरात येतात. आरोग्य नगरमध्ये जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या कडेला भाजीपाला विक्री करणाऱ्यांनी अतिक्रमण केल्यामुळे त्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. उमरगा शहरात भाजी विक्रेत्यांसाठी स्वतंत्र भाजी मंडई असतानासुद्धा भाजी विक्रेते भाजी मंडईत न बसता शहराच्या मुख्य रस्त्याच्या कडेला आणि आरोग्य नगर मध्ये जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या कडेला बसून भाजी विक्री करतात.

### मोकाट जनावराचा ठिय्या आंदोलन

वाढत्या मोकाट जनावरांमुळे वाहतूक कोंडीला हातभार लागत आहे. जनावरे महामार्गाच्या मध्यभागी बसत असल्याने वाहनांची लांबच लांब रांगा लागत आहेत.

# कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार, नऊ बंधारे पाण्याखाली, ऑरेंज अलर्ट जारी



आरंभ मराठी | कोल्हापूर

कोल्हापुरात रविवारी सायंकाळपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने रात्रभर रिपरिप कायम होती. शहरासह ग्रामीण भागात अनेक बंधारे पाण्याखाली गेले होते. शिंगणापूर, राजाराम, सुर्वे, इचलकरंजी, रुई, शिरोळ, यवलूज, हळदी आणि कोगे असे एकूण नऊ बंधारे पाण्याखाली गेले.दरम्यान, आज पावसाने दिवसभर तर विश्रांती घेतल्याचे दिसले. विशेष म्हणजे शिंगणापूर बंधाऱ्याची सर्व बरगे वेळेवर न काढल्यामुळे तो पाण्याखाली गेला. हवामान विभागाने कोल्हापूर जिल्ह्याला २९ मेपर्यंत ऑरेंज अलर्ट दिला असून, पुढील चार दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. या पावसाने शेतीचे मोठे नुकसान केले आहे. भुईमूग, नाचणी, तीळ, सूर्यफूल ही हाता–तोंडाशी आलेली पिके पावसामुळे शेतातच कुजली. उसाची भरणीही खोळंबली आहे. गेल्या ५० वर्षांत पहिल्यांदाच रोहिणीचा फेरा चुकला असून, मे महिन्यात धूळवाफ पेरण्या न झाल्याचे शाहूवाडीत दिसून आलेय. गगनबावड्यातदेखील दमदार पाऊस सुरू असून, दाट धुक्यामुळे पर्यटकांमध्ये तसेच कुंभी प्रकल्पातील साठ्यात वाढ झाली आहे. मात्र, शेतकऱ्यांसाठी हा पाऊस संकट घेऊन आलाय. भुदरगड तालुक्यात भुईमूग, सूर्यफुलाची पिके पूर्णपणे कुजली आहेत.गेल्या २४ तासांमध्ये गगनबावड्यात १४.१ मिलिमीटर, भुदरगड ८.९ मि.मी., तर चंदगड, राधानगरी, शाहूवाडी, आजरा, कागल, हातकणंगले, पन्हाळा, करवीर, शिरोळ आणि गडहिंग्लजमध्येही हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला आहे.

# बसव प्रतिष्ठाणतर्फे २७ जणांना बसवरत्न पुरस्कार प्रदान

## महात्मा बसवण्णा यांच्या मानवधर्म संदेशावर आधारित कार्याला उजाळा-शरण पाटील

आरंभ मराठी | मुरुम

बसव प्रतिष्ठाण (अखिल भारतीय सामाजिक संघटना) यांच्या वतीने मुरुम येथे आयोजित श्री महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवात राज्यभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २७ मान्यवरांना 'बसवरत्न' पुरस्काराने रविवारी (ता.२५) रोजी गौरविण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील होते. त्यांनी आपल्या भाषणात महात्मा बसवेश्वर यांनी दिलेल्या मानवधर्म संदेशाचा जागर करत समाजसुधारणेच्या कार्यावर भर देण्याचे आवाहन केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सह संचालक, साखर आयुक्तालय पुणे डी. आय. गायकवाड, विठ्ठलसाई कारखान्याचे संचालक विठ्ठलराव बदोले, उद्योजक बालाजी सुरवसे,



मुरुम नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ, माजी नगराध्यक्ष रशीद शेख, शाहीर रमेश खाडे, बसव प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. राम लिंग पुराणे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन, राष्ट्रगीत व शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. या वेळी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शाहीर रमेश खाडे यांनी महात्मा बसवेश्वरांच्या कार्यावर आधारित पोवाडा सादर करून वातावरण भारावून टाकले. पुरस्कृत मान्यवरांमध्ये सामाजिक,



शैक्षणिक, आरोग्य, पत्रकारिता, कृषी, प्रशासन, संगीत, व्यापार, विधी, सहकार अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश होता. यामध्ये श्रीराम कुलकर्णी (मुरूम), संतोष तगरखेडे (निलंगा), अशोक आलदर (सांगोला), बालाजी सुरवसे (धाराशिव), शेषेराव लवटे (कोरेगाव वाडी), संतोष महिमकर (सांगोला), अविनाश काळे (उम रगा), कांतराव मंडले (बेरडवाडी), बाळकृष्ण साळुंके (धाराशिव), पंडित मूदकण्णा (मुरूम), ॲड. फरहीन खान-पटेल (उमरगा) आदींचा समावेश आहे.जीवनगौरव पुरस्काराने काशिनाथ मिरगाळे (शैक्षणिक), चंद्रकांत राठोड (म हसूल सेवा), डॉ. महेश अर्दाले (वैद्यकीय) व शिवशरण वरनाळे (सहकार) यांना गौरविण्यात आले. बसव प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त प्राप्त ''महाराष्ट्ररत्न'' पुरस्काराबद्दल शरण पाटील यांच्या हस्ते काठी व घोंगडे देऊन विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण ठाकूर यांनी, प्रास्ताविक डॉ. रामलिंग पुराणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सौ. मनीषा नागिले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डिंगबर सोनटक्के, महेश लोणी, मल्लिनाथ सगरे, विजय घोडके, अमित ढाले, सागर कोळी, उमेश व शुभम पुराणे, आकाश वगरे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली. नागरिक, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरणचे सहव्यवस्थापकीय संचालक औंढेकरांनी उद्योजकांच्या जाणून घेतल्या समस्या

## उद्योजकांनी मानले आभार

आरंभ मराठी | लातूर

हावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर यांनी लातूर परिमंडळांतर्गत येणाऱ्या औद्योगिक वीजग्राहकांशी व्हिसी द्वारे संवाद साधत उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेत लवकरात लवकर निराकरण करण्याच्या सुचना दिल्या. याबाबत संघटनांच्या प्रतिनिधींनी आनंद व्यक्त करत आमच्या तक्रारींची दखल घंवून आश्वस्त केल्या बद्दल आभार व्यक्त केले.लातूर परिमंडळांतर्गत येणाऱ्या बीड, धाराशिव व लातूर जिल्ह्यातील सर्व औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींशी लातूर येथून व्हीडोओ कॉन्फर्सिंग व्दारे वार्तालाप करत वीजपुरवठयाबाबतच्या समस्या जाणून घेतल्या. लातूर जूनी व नवीन एमआयडीसी, माजलगाव, उमरगा येथील औद्योगिक ग्राहकांनी समस्यांचा पाढा वाचत अखंडीत वीजपुरवठयाम ुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी महावितरणने वीजयंत्रणा सक्षम करत अखंडीत वीजपुरवठा मिळावा, वारंवार आऊटेज घेवू नये तसेच त्याची आगावू सुचना उद्योजकोना देण्यात यावी याबाबत सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर यांना गळ घातली. तसेच उद्योगांना नवीन वीजजोडणी लवकरात लवकर देण्यात यावी अशी विनंतीही केली. वीजग्राहकांना तत्पर अखंडीत व योग्यदाबाची वीज सेवा देण्यासाठी मंडळ कार्यालया मध्ये जिल्हास्तरावर एक स्वतंत्र 'स्वागत सेल' सुरू करण्यात आलेला आहे. या माध्यमातून उद्योजकांना अधिक तत्पर सेवा देण्यासाठी' अधिकाऱ्यांनी तत्परतेने कार्यरत रहावे. लातूर परिमंडळाच्या सर्वच जिल्हयातील उद्योजकांना कायम उत्तम सेवा देण्याचा प्रयत्न महावितरण सातत्याने करत असते वीजपुरवठया बाबत काही अडचण असल्यास स्वागत सेलच्या माध्यमातून ती तात्काळ सोडवली जाणार आहे.

# येणेगूर येथे विविध विभागात निवड झालेल्या युवकांचा व दहावी, बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी | येणेगुर

उमरगा तालुक्यातील येणेगुर येथे दहावी, बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी, पोलीस, शिक्षण, महावितरण, जलसंपदा विभागात नव्याने निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आले.येणेगुर ग्रामस्थांच्या वतीने (ता.२५)वार रविवार रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रात हा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशस्वी झालेली व अभियंता पदावर निवड झालेल्या येणेगुर येथील ऋतुजा काशिनाथ कांबळे, पोलीस दलात भरती झालेले बुद्धभूषण गायकवाड, सुजित राजपूत, शिक्षक म्हणून नियुक्त झालेले वैजनाथ कांबळे, राजेंद्र कागे, महावितरण विभागात निवड झालेले शुभम स्वामी,निलेश गावकरे, कॅप्टन जोशी शाळेतील बारावी परीक्षेत प्रथम मुस्कान अल्ताफ तांबोळी, द्वितीय स्नेहा महादेव कांबळे, तृतीय गणेश रमेश बिराजदार व राधिका रवींद्र कळके, दहावी परीक्षेत प्रथम साक्षी दत्तात्रय मिरगे, ज्योती ज्ञानेश्वर कवठे द्वितीय, ज्योती शिवराज दुधभाते (तृतीय) हिचा यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येणेगुर येथील उद्योजक



दयानंद संगशेट्टी तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद माजी समाजकल्याण सभापती दिग्विजय शिंदे, जि.प. माजी सदस्य रफिक तांबोळी, उपसरपंच बाबासाहेब गायकवाड, शेखर स्वामी, मुख्याध्यापक महेश हरके यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास परमहंस शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देवराज बिराजदार, संचालक शंकर हुळमजगे, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष सतीश पाटील, ग्रामपंचायत सदस्य संतोष कलशेट्टी, संदीप बिराजदार, विजय सोनकटाळे, प्रदीप मदने, भीमा स्वामी, बबिता महनुर, गणेश जोजन, संयोजक राहुल बनसोडे, दिलीप येडगे, गणेश जोजन, अल्ताफ तांबोळी, सचिन दुधभाते, कुमार येडगे, विजयकुमार घंटे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन नागनाथ बनसोडे तर उत्तम कांबळे यांनी आभार मानले.

# धाराशिव-औसा मार्गावर दुचाकी चालकांची जीवघेणी कसरत;रस्ता उखडल्यामुळे प्रवाशांचे हाल

आरंभ मराठी | तेर

धाराशिव औसा मार्गावर रस्ता दुरुस्ती करण्यासाठी रस्ता उखडून टाकल्यामुळे लहान चालकांना जिवघेणी कसरत करावी लागत आहे. प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सांजा सारोळा ते समुद्रवाणी पाटीपर्यंत रस्ता उखडल्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. अशातच गेल्या आठवड्यापासून अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. गुत्तेदाराने एक बाजू खोदून टाकल्याम ुळे एकाच बाजूने वाहतूक सुरू असल्यामुळे दोन्हीकडील वाहनांना साईड न देता आल्यामुळे बरीच वाहने पलटी होत आहेत. दुचाकी स्वारांची अवस्था तर कमालीची त्रासदायक आहे. तशातच एखादे वाहन जर रस्त्यातच बंद पडले तर



वाहन धारकांना चिखलातून जिवावर उदार होऊन वाहन चालवावे लागते. संबंधित ठेकेदाराकडून हा रस्ता तातडीने दुरुस्त करून देण्यासाठी आमदार, खासदार यांनी या रस्त्याकडे तात्काळ लक्ष देऊन प्रवाशांचे होणारे हाल थांबवावेत अशी मागणी धाराशिव औसा मार्गावरील प्रवाशातून होत आहे.

# वीज यंत्रणेपासून अधिक सतर्क राहा, खबरदारी घ्या

## पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महावितरणकडून आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

गेल्या तीन चार दिवसांपासून सातत्याने विजांच्या कडकडाटासह मॉन्सूनपूर्व पाऊस कोसळत आहे. येत्या काही दिवसांत मॉन्सूनचे आगमन होणार आहे. त्यामुळे पावसाळ्यात वीजसुरक्षेबाबत अधिक सजग राहण्याची गरज आहे. पाणी हे विजेचे चांगले वाहक आहे. त्यामुळे प्रामुख्याने रस्त्यावरील सार्वजनिक वीजयंत्रणा, पथदिव्यांच्या लोखंडी खांबापासून आणि घरगुती वीज उपकरणांपासून विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन महावितरणकडून केले आहे.अतिवृष्टी, वादळी पावसामुळे तुटलेल्या वीजतारा, पथदिवे, वीजखांब रस्त्याच्या बाजूचे फिडर पिलर, रोहित्रांचे लोखंडी कुंपण, फ्यूज बॉक्स तसेच घरातील ओलसर विद्युत उपकरणे, शेतीपंपाचा स्वीचबोर्ड, विद्युत यंत्रणेजवळील इतर ओलसर वस्तू, साहित्य आदींमुळे विद्युत अपघात होण्याची शक्यता असते. मुसळधार पाऊस व जोराचा वारा यामुळे झाडे व फांद्या वीजतारांवर पडतात. वीजखांब वाकतात, वीजतारा तुटतात, लोंबकळत राहतात. अशा वीजतारांमध्ये वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने त्यापासून सावध राहावे.कशी घ्याल काळजी विजेच्या विविध उपकरणांचा ओलाव्याशी संपर्क होऊ देऊ नका.

फ्यूज तार म्हणून तांब्याऐवजी ॲल्युमिनियम अलॉय ही विशिष्ट धातूची तार वापरा. काही बिघाड झाल्यास वीजपुरवठा तत्काळ खंडित होतो व संभाव्य धोका टळतो.

घर किंवा इमारतीवरील दूरचित्रवाणीची डिश किंवा अँटेना वीज तारांपासून दूर ठेवावे,

ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नये तसेच



विजेचे स्वीचबोर्ड किंवा कोणत्याही उपकरणाला पाणी लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विजेवर चालणारी सर्व उपकरणे नेहमी स्वीच बोर्डपासून बंद करावीत.

पथदिवे किंवा विजेच्या खांबांना जनावरे बांधू नयेत तसेच त्यास दुचाकी टेकवून ठेवू नयेत.

# सरपंच परिषदेच्या महिला तालुका अध्यक्षपदी किरण गायकवाड यांची निवड

आरंभ मराठी | तामलवाडी

तुळजापूर तालुक्यातील पांगरदरवाडी येथील ग्रामपंचायत सदस्या किरण गणेश गायकवाड यांची सरपंच परिषदेच्या तुळजापूर महिला तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. रविवार दिनांक २५ मे रोजी तुळजापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. याप्रसंगी सरपंच परिषद पुणे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जितेंद्रराजे भोसले, महिला प्रदेशाध्यक्षा जिनत सय्यद, प्रदेश संघटक कोहिनूर सय्यद, राज्य प्रसिद्धी प्रमुख अनिल आगलावे, सोशल मीडिया प्रमुख प्रा.सतीश मातणे, धाराशिव जिल्हाध्यक्ष सुजीत हंगरगेकर, जिल्हा उपाध्यक्ष किरण व्हरकट, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब जेवे, तुळजापूर तालुकाध्यक्ष संजय गुंजोटे आदी उपस्थित होते. किरण गणेश गायकवाड या २०२२ साली ग्रामपंचायत सदस्या म्हणून निवडून आलेल्या आहेत. त्यांनी गावविकासाबाबत घेतलेले धोरणात्म क निर्णय व कार्याच्या योगदानाबद्दल त्यांची निवड करण्यात आली आहे. यापुढेही, गावविकासासोबत तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या विकासासाठी, विविध शासकीय योजना आणि निधी मिळवण्याम



ध्ये आपण महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे यावेळी नूतन तुळजापूर तालुका महिला अध्यक्षा किरण गायकवाड यांनी सांगितले.

# मुसळधार पावसामुळे निर्माण झालेली परिस्थित हाताळण्यास यंत्रणा सज्ज

## आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन

आरंभ मराठी | मुंबई

मुंबई, राज्यात मुसळधार पावसामुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज आढावा घेतला. राज्य आपत्कालीन कार्य केंद्रात मंत्री महाजन यांनी तातडीने भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. राज्यात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेली आपत्कालीन परिस्थिती सक्षमपणे हाताळण्यासाठी यंत्रणा २४७ सज्ज असल्याचे श्री. महाजन यांनी यावेळी सांगितले.आपत्ती व्यवस्थान संचालक सतीशकुमार खडके यांनी मंत्री महोदयांना माहिती दिली. यावेळी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.मंत्री श्री. महाजन म्हणाले, राज्यात प्रथमच मान्सूनपूर्व पाऊस मे म हिन्यात इतक्या मोठ्या प्रमाणात सुरु झाला आहे. मुसळधार पावसामुळे राज्यात निर्माण झालेल्या परिस्थितीत आवश्यक उपाययोजना व खबरदारी घेण्याचे आदेश सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि महानगरपालिक आयुक्तांना देण्यात आले आहेत. हवामान विभागाने राज्यात आणखी तीन दिवस पावसाचा अलर्ट दिला आहे. मान्सूनपूर्व पावसामुळे अचानक नदी, ओढ्याच्या पाण्याची पातळी वाढ होत आहे. अशा परिस्थितीत



रस्ते मार्गही बंद होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी कामाशिवाय घराबाहेर पडू नये तसेच पावसाळी पर्यटनासाठी धबधबे व अन्य ठिकाणी जातानाही नागरिकांनी दक्षता व काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना म दत करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF), राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF ) पथके तैनात केली आहेत. बाराम ती फलटण येथे काल राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) पथके नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी पाठविण्यात आली होती, असेही मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून बारामती, इंदापूरसह पुणे जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा

आरंभ मराठी | मुंबई

''मान्सून मुंबईसह महाराष्ट्रात दाखल झाला असून हवामान खात्याने मुंबई, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी उद्या रेड अलर्ट आहे. पालघरसाठी यलो अलर्ट आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांम ध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूरच्या घाट परिसरात पावसाचा जोर आणखी काही दिवस कायम राहणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची सुरक्षितता, बचाव व मदतकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. त्यासाठीच्या उपाययोजना तात्काळ राबवाव्यात. मुसळधार पावसाची शक्यता असलेल्या भागातील नागरिकांनी सावध रहावे. सुरक्षितस्थळी आसरा घ्यावा. स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात राहून त्यांच्या सूचनांचे पालन करुन सहकार्य करावे,'' असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुसळधार पाऊस होत असलेल्या जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.राज्याच्या अनेक जिल्ह्यात सुरु असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर काल मध्यरात्रीच बारामती येथे दाखल झालेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहाटेपासूनच बारामती, इंदापूर तालुक्यांसह पुणे जिल्ह्यातील गावांना भेट देऊन दिवसभर परिस्थितीची पाहणी केली. यावेळी राज्याचे अल्पसंख्याक विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक पृथ्वीराज जाचक, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित गावांचे सरपंच, स्थानिक संस्था, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते,



शासनाचे संबंधित अधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे ग्राम ीण भागातील गावांचा दौरा करत असतानाच, मंत्रालयातील राज्यस्तरीय आपत्ती नियंत्रण व व्यवस्थापन केंद्राकडूनही अन्य जिल्ह्यातील पाऊस, धरणांची स्थिती, स्थानिक परिस्थितीचा आढावा घेतला. मुसळधार पाऊस होत असलेल्या जिल्ह्यांच्या जिल्ह्याधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे चर्चा करुन परिस्थितीची, मदतकार्याची माहिती घेतली. शेतीचे, पिकांचे, पशुधनाचे, घरांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे निर्देश त्यांनी दिले. राज्य आणि जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी सतर्क रहावे, परस्परांच्या संपर्कात राहून समन्वयाने, सहकार्याने बचाव, मदतकार्य तात्काळ राबवावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुंबई उपनगर रेल्वेसेवेला पावसाचा फटका बसला असून हार्बर रेल्वेसेवा बंद होती. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या सेवा विलंबाने सुरु होत्या. महाडकडून स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडाकडे जाणारा रस्ता पावसामुळे बंद आहे. पंढरपूरला नदीकाठच्या एका मंदिरात अडकून पडलेल्या तीन पूजाऱ्यांची सुटका करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात थांबून नागरिकांना आवश्यक मदत करावी, अशा सूचना सर्वांना देण्यात आल्या आहेत. मुसळधार पाऊस सुरु असलेल्या भागातील नागरिकांनी शक्यतो घरीच थांबावे. घरात पाणी भरण्याची शक्यता असल्यास सुरक्षितस्थळी आसरा घ्यावा. आत्यंतिक गरज असल्याशिवाय घराबाहेर पडू नये. राज्य शासन व स्थानिक स्वराज संस्थांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही आपले कर्तव्य पार पाडत असताना स्वत:चीही काळजी घ्यावी, असे आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
आपलं धाराशिव....
मंगळवार दि.27 मे 2025

# तेर येथील त्रिविक्रम मंदिराच्या सभामंडपाचे काम दर्जाहीन

## आठ वर्षात दुसऱ्यांदा दर्जाहीन काम;शासनाचे २ कोटी ९० लाख रुपये पाण्यात

## पुरातत्व विभागाच्या कामाच्या गुणवत्तेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

सुभाष कुलकर्णी | आरंभ मराठी

**तेर –महाराष्ट्र शासनाने प्राचीन अवशेष जतन व्हावे म्हणून तेर येथील अनेक पुरातन ठिकाणे राज्य पुरातत्व विभागाने राज्य संरक्षित स्मारक म्हणून ताब्यात घेतले. त्यापैकी पुरातन अशा त्रिविक्रम मंदिराचे पुनर्निर्माण केले. परंतु, पहिल्याच पावसात पुरातत्व विभागाच्या कामाच्या गुणवत्तेचा करिश्मा समोर आला आहे. सभामंडपाला गळती लागून शासनाचे २ कोटी ९० लाख रुपये पाण्यात गेले. पुरातन वास्तूंना जतन करून त्यांचे संवर्धन करण्यासाठी शासन करोडो रुपये खर्च करते परंतु, पुरातत्व विभागाच्या हलगर्जीपणामुळे शासनाचे पैसे वाया जात आहेत. मागील आठ वर्षात दुसऱ्यांदा दर्जाहीन काम झाले आहे.**







१९९३ च्या भुकंपातील पडझडीनंतर तेर येथील त्रिविक्रम मंदिर पुरातत्व विभागाच्या ताब्यात गेले. त्यानंतर या मंदिराचे काम पुरातत्व विभागाच्या देखरेखीखाली पुनर्निर्माण करण्यात आले. त्यानंतर काही काळातच पावसाळ्यात गळती लागल्याने ही वास्तू धोकादायक बनली. पुन्हा एकदा हा पुरातन ठेवा जतन करण्यासाठी जून २०२३ मध्ये मिळालेल्या २ कोटी ९० लाख रुपये निधीतून दुरुस्ती करण्यात आली. त्याला काही आठवडे उलटत नाहीत तोच सध्या सुरू असलेल्या अवकाळी पावसात दुरुस्ती करण्यात आलेल्या सभामंडपास गळती लागली आहे. त्यामुळे पुरातत्व विभागाच्या दर्जाहीन कामामुळे पावसाळा सुरु होण्यापूर्वीच बांधकामास गळती सुरु झाल्याने शासनाचे २ कोटी ९० लाख रूपये पाण्यात गेले असेच म्हणावे लागेल.

### अशाने धार्मिक पर्यटन केंद्र कशी विकसित होणार ?

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी जिल्हाधिकारी म्हणून पदभार हाती घेतल्यानंतर धाराशिव जिल्ह्यात धार्मिक पर्यटन केंद्र विकसित करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले होते. यासाठी त्यांनी तेर, तुळजापूर, कुंथलगिरी येथील धार्मिक पर्यटनाच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले होते. परंतु, अशा पद्धतीने शासकीय पैशांचा चुराडा होणार असेल आणि त्यावर कोणाचेच नियंत्रण नसेल तर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन केंद्र कशी विकसित होणार? असा सवाल विचारला जात आहे.

### ८ वर्षांत पुरातत्व विभागाचे दुसरे दर्जाहीन काम

यापुर्वीही पुरातत्व विभागाच्या वतीने २०१० मध्ये संत गोरोबाकाका यांच्या राहत्या वाड्याचे काम सुरु करण्यात आले होते. त्यासाठी २५ लाख रूपये निधी खर्च करण्यात आला. परंतू जी अवस्था त्रिविक्रम मंदिराची झाली तीच अवस्था संत गोरोबाकाका यांच्या राहत्या वाड्याची झाली होती. सुरूवातीचे काम दर्जाहीन झाल्यानंतर पुन्हा याच कामासाठी २०१६ ला ७७ लाख रूपये निधी मंजूर झाला. त्यातून पुन्हा काम झाले ते ही दर्जाहीनच झाले. १ नोव्हेंबर २०२० रोजी माळवदाचा थर कोसळला होता. तेर मधील प्रेक्षणीय स्थळांना भेटी देत असताना तत्कालीन. जिल्हाधिकारी डॉ. कौस्तूभ दिवेगावकर यांनी १५ डिसेंबर २०२० रोजी संत गोरोबाकाका यांच्या राहत्या वाड्यास भेट दिली. त्यावेळी त्यांना कामाचा प्रकार लक्षात आला. या दर्जाहीन कामाची चौकशी करण्यासाठी तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी रूपाली आवले यांची चौकशी समिती नेमली होती. आवले यांनी १८ डिसेंबर २०२० रोजी संत गोरोबाकाका यांच्या राहत्या वाड्यास भेट देऊन या दर्जाहीन कामाची पाहणी केली.

### चौकशी अहवालाचे पुढे काहीच नाही झाले

पुरातत्व विभागाने पुढे या कामाच्या माळवदावर २०२१ मध्ये चक्क पत्र्याचे शेड मारून गळती थांबवली. परंतु, चौकशी समितीच्या अहवालाचे पुढे काय झाले हे समजलेच नाही. दरम्यान गेल्या आठ वर्षांत पुरातत्व विभागाच्या दर्जाहीन कामामुळे दोन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वास्तू कुचकामी ठरल्या आहेत. विशेष म्हणजे पुरातत्व विभागाच्या यादीतील ठेकेदार हे राष्ट्रीय पातळीवर काम केलेले ठेकेदार आहेत हे येथे लक्षात घेण्यासारखी बाब आहे. पुरातत्व विभागाच्या मापदंडानुसार हे कामे झाले आहेत की नाही हा संशोधनाचा विषय आहे.

# मंत्री छगन भुजबळ यांचा समता परिषद धाराशिव शाखेच्या वतीने सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव – नवनियुक्त अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांचा अखिल भारतीय समता परिषदेच्या जिल्ह्याच्या वतीने सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकाऱ्यानी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीची प्रतिमा कवड्याची माळ देऊन सत्कार करण्यात आला. मंत्री भुजबळ यांच्या बांद्रा येथील निवासस्थानी झालेल्या या सत्कार समारंभात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद धाराशिवच्या वतीने जिल्ह्यातील कार्याचा आढावा सादर करण्यात आला.यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे मराठवाडा प्रदेश अध्यक्ष आबासाहेब खोत, धाराशिव जिल्हाध्यक्ष विभीषण खुणे, जिल्हा कार्याध्यक्ष संतोष डोरले, कळंब तालुकाध्यक्ष प्रशांत वेदपाठक ,धाराशिव तालुकाध्यक्ष रॉबिन बगाडे, तुळजापूर शहराध्यक्ष मनोज वाघमारे यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने पोलीस अधीक्षक रितू खोकर यांचा सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिवच्या शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने धाराशिवचे नूतन पोलीस अधीक्षक रितू खोकर यांचा सोमवारी (दि.२६) सत्कार करण्यात आला. तसेच नुतन अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांचा देखील समितीच्या वतीने आदर सत्कार करण्यात आला. धाराशिव जिल्ह्याला या दोन्ही कर्तव्यदक्ष महिला अधिकारी मिळाल्याने धाराशिवकर जनतेच्या वतीने हा औपचारिक सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. जिल्ह्यातील सामाजिक व शांततेच्या दृष्टीने विविध विषयावर समितीचे पदाधिकारी व दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अतिशय सकारात्मक चर्चा केली. शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव ही प्रशासनाला



वेळोवेळी सहकार्य करून जिल्ह्यामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेत असते असे समितीच्या वतीने दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांना हमी देण्यात आली. यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे उपाध्यक्ष अमोल सिरसट, तालुकाध्यक्ष मनोज मोरे, शहराध्यक्ष हनुमंत यादव, उपाध्यक्ष आकाश भोसले, सचिव भैरवनाथ रणखांब, कार्याध्यक्ष बालाजी खोचरे, रिक्षा समितीचे कार्याध्यक्ष योगेश अतकरे, धर्मराज सूर्यवंशी शुभम लोकरे, गणेश पवार, सुनील शिंदे यांच्यासह समितीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# उमरगा शहरात पुन्हा एकदा दमदार पाऊस

## गटारी तुडुंब भरल्याने पावसाचे पाणी महावितरण कार्यालयामध्ये घुसले

आरंभ मराठी | उमरगा

गेल्या सहा सात दिवसापासून उमरगा शहर व परिसरात कधी हलक्या तर कधी मध्यम स्वरूपात अवकाळी पाऊस बरसात होता. परंतु, सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास उमरगा शहरात मोठ्या प्रमाणात अवकाळी पावसाने तडाखा दिल्याने शहरातील सर्वच रस्ते जलमय झाले. सोमवारचा हा पाऊस सुमारे दोन तास चालू होता. मेघगर्जना व विजाच्या कडकडाटामुळे पावसाने अधिकच रौद्ररूप धारण केले होते. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर धावपळ सुरू होती. शहराच्या अनेक सखोल भागात पावसाचे पाणी साचले. उमरगा बस स्थानका समोरील गटारी साफ न केल्याने गटारी तुडुंब भरून सर्वत्र पावसाचे पाणी महावितरण कार्यालयामध्ये घुसल्याने महावितरण कार्यालयास ओढ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. शिवाय अनेक ठिकाणचा कचरा या पावसामुळे रस्त्यावर आला. शहरातील सर्वच गटारी तुडुंब भरून वाहत होते.

# मुरुम येथे ज्ञानदान विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा २६ वर्षानंतर स्नेहमेळावा उत्साहात

## शिक्षक-विद्यार्थ्यांच्या नात्यांचा भावस्पर्शी संगम,बालपणीच्या आठवणींना तेजोमय उजाळा

आरंभ मराठी | मुरुम

मुरुम येथील ज्ञानदान विद्यालयातील इयत्ता दहावीच्या बॅच १९९९ चा स्नेहमेळावा रविवारी (ता. २५) रोजी उत्साहात आणि भावनांच्या भरगच्च वातावरणात शहरातील मालपाणी मंगल कार्यालयात पार पडला. पावसाच्या पार्श्वभूमीवर शाळेऐवजी बंद सभागृहात हा सोहळा आयोजित करण्यात आला. उपस्थितांचे पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले आणि दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमात ''एक शिक्षक एक विद्यार्थी'' या संकल्पनेखाली अनेकांनी आपल्या मनोगतांद्वारे जुन्या आठवणी जागवल्या. बालपणीच्या खोडकर क्षणांपासून ते शिक्षकांच्या शिकवणीपर्यंत अनेक क्षणांना उजाळा देताना अनेकांनी संत साहित्य, राष्ट्रपुरुषांचे पराक्रम आणि समाजातील महानायिकांच्या संघर्षाचे प्रेरणादायी दाखले दिले. या स्नेहसंमेलनात तत्कालीन मुख्याध्यापक नागाप्पा करपे यांच्यासह माणिक लूल्ले, शंकरराव माने, राजशेखर खुणे, प्रकाश रोडगे, मुख्याध्यापक गुरप्पा कुंभार यांचा विद्यार्थ्यांनी सन्मान केला. प्रमुख पाहुणे माजी नगरसेवक चंद्रशेखर मुदकण्णा व प्रभाकर मदने यांनीही आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांनी गाणी, किस्से, शाळेतील आठवणी शेअर करत पुन्हा एकदा 'शाळकरी' दिवस जगले. कार्यक्रमाच्या शेवटी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. शाळेने घडवलेले हे विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत कार्यरत असले तरी, त्या दिवशी प्रत्येकजण मनाने पुन्हा विद्यार्थ्यासारखे होत एकमेकांशी प्रेमाने, आत्मीयतेने भेटले. या स्नेहमेळाव्याने ज्ञानदान विद्यालय ही केवळ एक शिक्षणसंस्था नसून ती जीवनमूल्यांची शिदोरी आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महेश वडदरे यांनी स्नेहसंमेलनाची कल्पना आणि तयारी यावर प्रकाश टाकत सर्वांचे स्वागत केले. सूत्रसंचालन दिनेश बडूरे तर आभार नहिरपाशा मासूलदार यांनी मानले. या स्नेह मेळावा कार्यक्रमाकरिता १९९९ बॅचच्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले व हा सुंदर स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साही वातावरणात घडवून आणला.



# आपलं घर येथील मंत्री मंडळाचा बालकल्याण समितीच्या वतीने सत्कार

आरंभ मराठी | नळदुर्ग

आलीयाबाद येथील आपलं घर येथील बालगृहातील नवीन निवडलेल्या मंत्रीमंडळाचा सत्कार २६ मे रोजी धाराशिव बालकल्याण समितीच्या वतीने आपलं घर येथे करण्यात आला. बालगृहातील बालकांना राज्य मंत्रीमंडळ संरचना, शिस्त, जबाबदारी, योग्य प्रशासन, निवडणूक प्रक्रिया, मुक्तपणे काम करण्याच्या पद्धती याची माहिती व्हावी म्हणून एक वर्षासाठी बालगृहात या मंत्री मंडळाची नियुक्ती होते. या वर्षी आपलं घर बालगृहात झालेल्या निवडणुकीत मुख्यमंत्री म्हणून समर्थ स्वामी, उपमुख्यमंत्री कुणाल कांबळे, शिक्षणमंत्री शुभांगी सावंत, भोजन मंत्री विशाल सुर्यवंशी, सांस्कृतिक मंत्री आर्या चव्हाण, स्वच्छता मंत्री रेश्मा काळे, आरोग्य मंत्री गंगा मादगे,शिस्त मंत्री शामबाला नरवटे,क्रिडा मंत्री कुणाल अंगुले यांची निवड झाल्याने बालकल्याण समितीच्या वतीने या मंत्री मंडळाचा सत्कार करण्यात आला. यासाठी बालकल्याण समितीचे अध्यक्ष विजयकुमार माने, सदस्या ॲड मैना भोसले, ॲड सुजाता माळी, सदस्य दयानंद काळुंके, अणदूरचे पोलीस पाटील जावेद शेख, आपलं घर येथील व्यवस्थापक विलास वकील, अधिक्षक संदिप चवले, माजी सरपंच प्रबोध कांबळे, अणदूर ग्रा पं सदस्या अनुसया कांबळे, संत तुकाराम सामाजिक संस्थेच्या सदस्या कविता देडे, अनिता काळुंके, सुरज देडे, चाईल्ड लाईनचे अभयकुमार काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# राज्यस्तरीय एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत सार्थक चुंगे राज्यात दुसरा तर संचिता चुंगे राज्यात सहावी

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील ओरियन इंग्लिश स्कूलचा इयत्ता तिसरी वर्गातील विद्यार्थी सार्थक संतोष चुंगे या विद्यार्थ्याने राज्यस्तरीय एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात दुसरा क्रमांक मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. त्याला तीनशे पैकी २८६ गुण मिळाले आहेत. तर कुशाबा धोंडिबा शेंडगे इंग्लिश स्कूलची संचित संतोष चुंगे ही सहावी वर्गातील विद्यार्थिनीने राज्यात सहावा क्रमांक मिळविला आहे. तिला तीनशे पैकी २७६ गुण मिळाले आहेत. उमरगा तालुक्यातून ६०० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र राज्यभर ही परीक्षा घेतली जाते. तिला सहशिक्षक संतोष चुंगे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल एटीएस प्रज्ञाशोध परीक्षा प्रमुख विनोद कोळी, तालुका समन्वयक क्रांती व्हटकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.





# भव्य तिरंगा रॅलीने ऑपरेशन सिंदूरमधील भारतीय सैन्याच्या शौर्याला सलाम

## हुतात्मा स्मारक ते तहसील कार्यालयापर्यंत देशभक्तांचा जनसागर;माजी सैनिकांचा सत्कार

आरंभ मराठी | उमरगा

''ऑपरेशन सिंदूर''च्या माध्यमातून भारतीय सैन्याने पाकिस्तानला धडा शिकवून दिला आणि आपले अद्वितीय शौर्य सिद्ध केले. या धाडसी कारवाईबद्दल भारतीय सैन्याचा गौरव करण्यासाठी उमरगा शहरात सोमवारी (ता. २६) रोजी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. हुतात्मा स्मारक येथून तहसील कार्यालयापर्यंत काढलेल्या या रॅलीत देशभक्त नागरिकांचा जनसागर उसळला होता. ''भारत माता की जय'', ''वंदे मातरम्'', ''जय हिंद'' अशा देशभक्तीने भारलेल्या घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. रॅलीच्या माध्यमातून नागरिकांनी भारतीय जवानांच्या कार्याला सलाम करत एकात्मतेचा आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश दिला. या रॅलीत माजी सैनिकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या सेवेचा गौरव करत उपस्थितांनी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड, शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले, डॉ. चंद्रकांत महाजन, उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार, पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, माजी सैनिक संघटना जिल्हाध्यक्ष शहाजी चालुक्य, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, मराठवाडा युवती सेना निरीक्षक ॲड. आकांक्षा चौगुले, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिग्विजय शिंदे, शिवसेना उमरगा तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, लोहारा तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, युवा सेना जिल्हाप्रमुख सचिन जाधव, भाजपा तालुकाध्यक्ष शहाजी पाटील, योगेश तपसाळे, संतोष सगर, चंद्रशेखर सूर्यवंशी, अभिमान खराडे, बी.के. पवार, अमोल पाटील, डॉ. फरीद अत्तार, सुशील दळगडे, शंतनु सगर, शमशोद्दीन जमादार, भीमा स्वामी, नेताजी कवठे, संदीप चौगुले, विनोद कोराळे, अमर शिंदे, संध्याताई शिंदे, लताताई भोसले, रेखाताई सुर्यवंशी, शरद माने, खयूम चाकुरे, लिंगराज स्वामी, पद्माकर पाटील, हरिश डावरे, माजी सैनिक संघटनेचे प्रकाश रणखांब, व्यंकट चौधरी, ज्ञानेश्वर पवार, किशोर गायकवाड, गोविंद काळे, घनश्याम पाटील, बब्रुवान गायकवाड, राजेंद्र बेंडकाळे, परमेश्वर चौगुले, वाल्मिक भोसले, सत्यभामा घाटे, सावित्री पतंगे यांचा समावेश होता.याशिवाय उमरगा शहरासह तालुक्यातील नागरिक, महिलावर्ग, शालेय विद्यार्थी आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. या रॅलीमुळे संपूर्ण उमरगा तालुका देशभक्तीच्या भावनांनी भारावून गेला होता. ही रॅली केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर राष्ट्रीय अभिमानाचा आणि एकात्मतेचा एक जिवंत उत्सव होता. भारतीय जवानांच्या शौर्याला सलाम करत उमरग्यातून देशप्रेमाचा संदेश देण्यात आला.








# उमाकांत मिटकर यांना महाराष्ट्र महागौरव पुरस्कार प्रदान




आरंभ मराठी | नळदूर्ग

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना, महाराष्ट्र यांच्या वतीने देण्यात येणारा महाराष्ट्र महागौरव पुरस्कार राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नळदूर्गचे सुपूत्र उमाकांत मिटकर यांना प्रदान करण्यात आला. या प्रसंगी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, आयुष्मान भारत महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे, एबीपी माझा च्या सरिता कौशिक, संघटनेचे अध्यक्ष राजा माने यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.भटक्या विमुक्त समाजाच्या कल्याणासाठी उमाकांत मिटकर यांच्या माणुसकीचा समाजस्पर्श लाभलेल्या कार्याला हा मानाचा मुजरा आहे. समाजात अनेक समस्या आहेत. प्रत्येक समस्येवर प्रत्येकच जण तोडगा काढू शकणार नाही. पण भटक्या विमुक्त समाजाच्या उत्थानामध्ये उमाकांत मिटकर यांच्यासारख्या समाजसमर्पित व्यक्तीकडून मिळणारे योगदान दीपस्तंभासारखे आहे असे या प्रसंगी मान्यवरांनी सांगितले. महाराष्ट्रातील पत्रकारिता व अन्य विविध क्षेत्रांमध्ये भरीव योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव दरवर्षी महाराष्ट्र महागौरव पुरस्कार देऊन करण्यात येत असतो. यंदाचा हा सोहळा रविवारी, २५ मे रोजी पुणे येथे पार पडला. उद्योग, समाजसेवा, आदिवासी विकास, शिक्षण अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा यात सहभाग होता.उमाकांत मिटकर यांच्या समाजनिष्ठ वाटचालीची कथा मांडणारे 'डिव्हाईन जस्टिस' हे पुस्तकही मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तीन भाषांतून प्रकाशित झालेले असून त्यांच्या कार्याची माहिती देणारा 'इदं न मम' हा माहितीपट यूट्यूबवर उपलब्ध आहे.